# सिटी न्यूज अमरावती

शुक्रवार, दि. ३ एप्रिल २०२६ http://epaper.citynewssuperfast.com


## जिल्ह्यात कलम ३८ लागू

**अमरावती :** जिल्ह्यात शांतता व सुव्यवस्था अबाधित राहावी, यासाठी पोलीस अधीक्षक, अमरावती (ग्रामीण) विशाल आनंद यांनी महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ चे कलम ३८ अन्वये प्रतिबंधात्मक आदेश जारी केला आहे.

हा प्रतिबंधात्मक आदेश संपूर्ण अमरावती जिल्ह्यात, पोलीस आयुक्तांचे परिक्षेत्र वगळून कायदा व सुव्यवस्था अबाधित रहावी, याकरिता दि. २ एप्रिल ते १६ एप्रिल २०२६ पर्यंत लागू करण्यात आला आहे.

कोणीही सदर आदेशाचा भंग केल्यास तो महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ चे कलम १३६ अन्वये शिक्षेस पात्र राहील. या कलमांचा भंग करणाऱ्या व्यक्तीविरुद्ध कायदेशीर कारवाई करण्यात येईल, असेही पोलीस अधीक्षक, अमरावती (ग्रामीण) यांनी कळविले आहे.

# पाणीपट्टी वसुलीत उर्ध्व वर्धा प्रकल्प अव्वल

प्रतिनिधी ३ एप्रिल



**अमरावती:** पश्चिम विदर्भातील उर्ध्व वर्धा प्रकल्प सर्वात मोठा प्रकल्प आहे. या प्रकल्पाची निर्मित सिंचन क्षमता ही ८५,००२ हेक्टर, तर जलसाठा ५६४.०५ दलघमी आहे. या प्रकल्पातून अमरावती व वर्धा तालुक्यामध्ये कालव्याद्वारे सिंचनासाठी पाणी उपलब्ध करुन देण्यात येते. या प्रकल्पाचे पाणीपट्टी वसुलीत अव्वल स्थान पटकाविले आहे.

सन २०२५-२६ या वर्षा करीता सिंचनासाठी २.१६४ कोटी रुपये वसुली करण्याचे उद्दिष्ट विभागाला देण्यात आले होते. सन २०१६ मध्ये उर्ध्व वर्धा प्रकल्प विभागाचे रुपांतरण सिंचन पाटबंधारे विभागामध्ये करण्यात आले. कामाचे नियोजन व सातत्याने करण्यात आलेल्या पाठपुराव्यामुळे थकित लाभधारकांना पाणीपट्टी भरण्यासाठी केलेल्या आवाहनामुळे या विभागाने सुमारे ०.७६ कोटी रुपये वसुली केली आहे.

तसेच या प्रकल्पामधून बिगर सिंचनासाठी पाणी उचल करणाऱ्या सर्व यंत्रणांना मार्च २०२६ पुर्वी थकबाकीचा भरणा करण्याबाबत सूचना देण्यात आल्या. बिगर सिंचनासाठी ४० कोटी उद्दिष्टांपैकी ५०.७५ कोटी रुपयांचा विक्रमी वसुली झाल्याची माहिती कार्यकारी अभियंता अनिकेत सावंत यांनी दिली. सिंचन व बिगर सिंचन पाणीपट्टी मिळून सुमारे ५१.५१ कोटी रुपये सर्वाधिक वसुलीच्या विक्रमाची नोंद करण्यात आली आहे. इतिहासामध्ये प्रथमच मोठ्या प्रमाणात सिंचन पाणीपट्टी वसुली झाली आहे.

उद्दिष्ट साध्य करण्यासाठी अधिक्षक अभियंता मनिष राजभोज यांच्या नेतृत्वाखाली अधिकारी व कर्मचाऱ्यांनी अहोरात्र मेहनत घेतली. यामुळे उद्दिष्टाच्या १२२.१७ टक्के उद्दिष्ट गाठले आहे. सर्व वसुलीच्या मोहीमेमध्ये बिगर सिंचन पाणीपट्टी वसुलीचे योगदान महत्वाचे आहे. या मोहीमेत सहभागी सर्व उपविभागीय अभियंता, शाखा अभियंता, स्थापत्य अभियांत्रिकी सहायक, कालवा निरिक्षक, मोजणीदार, दप्तर कारकुन व तसेच सर्व क्षेत्रीय तथा विभागीय कार्यालयातील अधिकारी, कर्मचारी यांनी सहभाग नोंदविला.

# अवैधरित्या चालणाऱ्या वरली मटका धंद्यावर धडक कारवाई

प्रतिनिधी ३ एप्रिल

**अमरावती :** अवैधरित्या चालणाऱ्या वरली मटका धंद्यावर गुन्हे शाखेने धाड टाकून कारवाई केली आहे. पोलीस आयुक्त राकेश ओला यांनी अवैध्य धंदयाना आळा बसावा याकरीता कारवाई करण्याबाबत आदेशीत केले वरून आज दिनांक ०२/०४/२०२६ रोजी गुन्हे शाखा यांनी गुप्त माहीतीवरून पो.स्टे. नागपुरी गेट, पोस्टे बडनेरा व पोस्टे राजापेठ येथील अवैध्य धंदयावर रेड करून वरली मटक्याचा अवैध्य धंदा करणा-या ५ इसमांना ताब्यात घेवून त्यांचे ताब्यातून वरली मटका साहीत्य व नगदी असे एकूण ६,३४०/- रु चा मुददेमाल ताब्यात घेतला.

## गुन्हे शाखेची कारवाई




पो.स्टे. नागपुरी गेट हददी मधील कमेला ग्राउड येथे जुगार रेड करून आरोपीबाबुराव महादेव तायडे, वय ७१ वर्ष, रा. हिरपुर, ता. मुर्तीजापुर, जि. अकोला, नुरुददीन उर्फ राजा निजामोददीन पठाण वय ३८ वर्ष रा. नागपुरी गेट अमरावती यांचे ताब्यातून जुगार साहीत्य व नगदी असा एकुण ३,३८०/-रू या मुदेमाल जप्त करून त्याचे विरूध्द पो.स्टे. नागपुरी गेट येथे कलम १२ (अ) म.जु.का. प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात येत आहे.

पो.स्टे. बडनेरा हददी मधील गवळीपुरा येथे जुगार रेड करून आरोपी शेख आरीफ शेख हसन, वय ४० वर्ष, रा. मोबीनपुरा बडनेरा, अमरावती शख आरीफ शेख कासम नौरंगाबादी वय ३२ वर्ष रा. गवळीपुरा बडनेर, अमरावती. यांचे ताब्यातून जुगार साहीत्य व नगदी असा एकुण २,१३०/- रू या मुदेमाल जप्त करून त्याचे विरूध्द पो.स्टे. बडनेरा येथे कलम १२ (अ) म.जु.का. प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात येत आहे.

पो.स्टे. राजापेठ हददी मधील बेलपुरा गल्ली नं. ३ मोकळया जागेत जुगार रेड करून आरोपी गौतम मुकुटलाजल दाधीच, वय ३९ वर्ष, रा. चिचफैल संतोषी माता मंदीर जवळ, अमरावती, (फरार) सचिन राधेशाम पाताळबंशी, वय ४३ वर्ष, रा. फेजरपुरा, अमरावती यांचे ताब्यातून ८३०/- रू चे जुगार साहीत्य जप्त करून त्यांचे विरूध्द पो.स्टे. राजापेठ येथे कलम १२ (अ) म. जु.का. सहकलम ४९ बि.एन. एस प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात येत आहे.

सदरची कारवाई पोलीस आयुक्त राकेश ओला, पोलीस उपायुक्त परीमंडळ-१ गणेश शिंदे, पोलीस उपायुक्त परीमंडळ-२ श्याम घुगे, पोलीस उपायुक्त (मुख्यालय तथा गुन्हे) रमेश धुमाळ, सपोआ (गुन्हे) शिवाजी बचाटे, यांचे मार्गदर्शनात गुन्हे शाखा चे पोलीस निरीक्षक संदिप चव्हाण यांच्या नेतृत्वात गुन्हे शाखेचे अधिकारी व अंमलदार यांनी केली आहे.

# श्री. हनुमान जन्मोत्सवाच्यानिमित्त हनुमान गढी येथे धार्मिक व आध्यात्मिक कार्यक्रम

प्रतिनिधी ३ एप्रिल




**अमरावती :** श्री.हनुमान गढी अमरावती येथे गुरुवार दि. २ एप्रिल २०२६ रोजी सकाळी ८.०० वाजता पासुन होम हवन, सकाळी ११.०० वाजता पुर्णाहुती आरती

सायं ६.०० वाजतापासुन संगितमय सुंदरकांड पठन आणि रात्री ९.०० वाजता श्री.हनुमान जी यांची महाआरती इत्यादी धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन

आ.रवि राणा व भाजपा नेत्या हिंदु शेरणी माजी खा.नवनित राणा यांची राहणार प्रमुख उपस्थिती

४० फुट फाऊंडेशन व १११ फुट उंच अशी एकुण १५१ फुट भव दिव्य श्री.हनुमान जी यांची मुर्ती राहणार भाविकांसाठी आकर्षण

समस्त श्री.हनुमान भक्तांनी या सर्व धार्मिक कार्यक्रमाकरिता येऊन लाभ घेण्याचे हनुमान चालिसा चॅरीटेबल ट्रस्ट अमरावतीच्या वतीने आवाहन केले.हनुमान जन्मोत्सवाच्या पावन पर्वानिमित्त हनुमान चालीसा चॅरीटेबल ट्रस्ट, अमरावती यांच्या वतीने शहरातील हनुमान गढी अमरावती या पवित्र ठिकाणी विविध धार्मिक व आध्यात्मिक कार्यक्रमांचे भव्य आयोजन करण्यात आले आहे. गुरुवार, दि. २ एप्रिल २०२६ रोजी सकाळी ८.०० वाजल्यापासून कार्यक्रमांची सुरुवात होणार असून, यामध्ये पारंपरिक पद्धतीने होम-हवन करण्यात येणार आहे. त्यानंतर सकाळी ११.०० वाजता पूर्णाहुती आरती संपन्न होईल. या धार्मिक विधींमुळे परिसरात भक्तिमय वातावरण निर्माण होणार आहे. सायंकाळी ६.०० वाजल्यापासून संगीतमय सुंदरकांड पठणाचे आयोजन करण्यात आले असून, भाविकांना रामभक्त हनुमानाच्या पराक्रमांची व भक्तीची अनुभूती घेण्याची संधी मिळणार आहे. रात्री ९.०० वाजता श्री. हनुमानजींची भव्य महाआरती होऊन दिवसाच्या कार्यक्रमांची सांगता होईल. या सर्व कार्यक्रमांमुळे श्री. हनुमान गढी परिसर भक्तिरसात न्हाऊन निघणार असून विशेष म्हणजे या सर्व धार्मिक कार्यक्रमाकरिता आ.रवि राणा व भाजपा नेत्या हिंदु शेरणी मा.खा.नवनित राणा या सुद्धा उपस्थित राहणार असल्याचे आयोजकांच्या वतीने सांगण्यात आले. त्याचप्रमाणे शहरातील तसेच परिसरातील हजारो भाविक उपस्थित राहण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे. समस्त श्री. हनुमान भक्तांनी या धार्मिक व आध्यात्मिक कार्यक्रमांचा लाभ घेण्यासाठी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन हनुमान चालीसा चॅरीटेबल ट्रस्ट यांच्या वतीने करण्यात आले आहे.

# अर्धशतकाची परंपरा जपणारा आयटीआय कॉलनीतील हनुमान जन्मोत्सव उत्साहात साजरा

प्रतिनिधी ३ एप्रिल

**अमरावती :** आयटीआय कॉलनीतील श्री. हनुमान मंदिरात यंदाचा हनुमान जन्मोत्सव मोठ्या उत्साहात आणि भक्तीमय वातावरणात साजरा करण्यात आला.

तब्बल पन्नास वर्षांची परंपरा लाभलेल्या या मंदिराने परिसरातील नागरिकांना केवळ धार्मिक नव्हे तर सामाजिक एकोप्याचा आदर्श दिला आहे. पहाटेपासूनच 'बजरंग बली की जय'च्या घोषणांनी आणि भजनांच्या सुरांनी संपूर्ण परिसर दुमदुमून गेला होता. मंदिर परिसर आकर्षक रोषणाई, भगवे ध्वज आणि स्वच्छतेने सजवण्यात आला होता. या सोहळ्यासाठी कॉलनीतील तरुणांनी आणि ज्येष्ठांनी अनेक दिवसांपासून तयारी केली होती.



या मंदिराचा इतिहासही तितकाच प्रेरणादायी आहे. सुमारे पन्नास-साठ वर्षांपूर्वी आयटीआय कार्यालयातील कर्मचाऱ्यांनी एकत्र येऊन या परिसरात वसाहत निर्माण केली आणि मन:शांतीसाठी या मंदिराची स्थापना केली. त्या काळी हा परिसर ओसाड होता, मात्र आज येथे श्रद्धेचा नंदादीप अखंड तेवत आहे.

जन्मोत्सवाच्या निमित्ताने शांतीविहार, जागृती आणि नवीन आयटीआय कॉलनीतील महिलांनी मोठ्या संख्येने सहभाग घेतला. धार्मिक कार्यक्रम, आरती, पूजा आणि कीर्तन यामध्ये त्यांचे मोलाचे योगदान दिसून आले. महाप्रसादाचा लाभ हजारो भाविकांनी घेतला. या मंदिराचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे येथील लोकांमधील आपुलकी आणि सहकार्याची भावना. सण-उत्सवाबरोबरच संकटकाळातही एकमेकांना मदत करण्याची परंपरा येथे जपली जाते.

# मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रमात जिल्ह्याची भरारी

## ◆ १ हजाराहून अधिक प्रकरणांना मंजुरी ◆ राज्याच्या अग्रगण्य जिल्ह्यात स्थान

प्रतिनिधी ३ एप्रिल

**अमरावती:** मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रमात जिल्ह्याने ऐतिहासिक कामगिरी केली आहे. या कामगिरीमुळे राज्याच्या प्रगती अहवालात जिल्ह्याचा ठसा उमटला आहे. जिल्हाधिकारी कार्यालयाने १ हजार ५५ प्रकरणांना मंजुरी देऊन जळगाव, कोल्हापूर, नाशिक आणि सांगली यासारख्या जिल्ह्याच्या पंगतीत स्थान मिळविले आहे.

जिल्ह्यात योजनेला चांगला प्रतिसाद मिळाला. यात एकूण ४ हजार १८४ अर्ज प्राप्त झाले. अर्जाची छाननी करून ३,६९१ प्रकरणे बँकेकडे कर्ज मंजुरीसाठी पाठविण्यात आली. यातील १ हजार ५५ प्रकरणे मंजूर करण्यात आली. ग्रामीण आणि शहरी प्रगतीमध्ये क्षेत्रनिहाय प्रगतीचा विचार करता, ग्रामीण भागातून ६६९ प्रकरणांना मंजुरी मिळाली आहे, तर शहरी भागातील ३८६ तरुणांना योजनेचा लाभ मिळाला आहे. ग्रामीण भागात अधिक प्रकरणे मंजूर झाल्याने ग्रामीण अर्थव्यवस्थेला गती मिळत आहे.

योजना राबविताना महत्त्वाच्या पैलूवर जिल्हा प्रशासनाने लक्ष केंद्रीत केले. प्रामुख्याने महिला सक्षमीकरणात महिला उद्योजकांवर विशेष भर देण्यात आला. यासाठी एकूण ६३३ महिलांची प्रकरणे मंजूर करण्यात आली आहेत. यातून महिला आणि ग्रामीण युवकांना प्राधान्य देण्यात आले. एक जिल्हा एक उत्पादन उपक्रमात कापड उद्योग क्षेत्रातील ३०६ प्रकरणांना मंजुरी मिळाली आहे.

मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रमात अधिकाधिक कर्जप्रकरणे मंजूर व्हावीत, यासाठी जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांनी प्रयत्न केले. यात दर महिन्याला बँक व्यवस्थापकांची बैठक घेऊन कर्ज प्रकरणे मंजूर करण्याचे निर्देश देण्यात आले. तसेच कर्ज प्रकरणे मंजूर करणाऱ्या बँकांच्या शाखेला भेट देऊन प्रक्रियेविषयी माहिती घेतली. जिल्हा प्रशासनाच्या वतीने स्थानिक उद्योगांना चालना देणे, स्वयंरोजगार निर्मिती, बँकांमार्फत सुलभ कर्ज प्रक्रिया आणि विशेषतः युवक व महिलांना प्राधान्य देणे या चतुःसूत्रीवर भर देण्यात आला आहे. जिल्हाधिकारी कार्यालयाच्या प्रभावी नियोजनामुळे जिल्ह्यातील बेरोजगारी कमी होण्यास आणि उद्योजकतेला नवी दिशा देण्यास मदत होत आहे. या मोहिमेत स्टेट बँक ऑफ इंडिया, सेंट्रल बँक ऑफ इंडिया, बँक ऑफ महाराष्ट्र, बँक ऑफ बडोदा आणि कॅनरा बँक यांनी प्रामुख्याने सक्रिय सहभाग नोंदविला.

# जिल्ह्यात 'एचटीबीटी' कापूस बियाण्यांवर बंदी

## ◆ नियमांचे उल्लंघन केल्यास ५ वर्षे कारावास

प्रतिनिधी ३ एप्रिल

**अमरावती:** जिल्ह्यात खरीप हंगाम २०२६-२७ची तयारी सुरू झाली आहे. या पार्श्वभूमीवर कृषि विभागातर्फे शेतकऱ्यांना महत्त्वपूर्ण आवाहन केले आहे. कापूस लागवडीसाठी शासनाची मान्यता नसलेल्या बीजी-३ (एचटीबीटी) बियाण्यांचा वापर टाळावा, असे निर्देश कृषी विभागाने दिले आहेत. नियमाचे उल्लंघन केल्यास पाच वर्षे कारावास आणि एक लाख रूपयांच्या दंडाची तरतूद करण्यात आली आहे.

शासनाने केवळ बीजी-१ आणि बीजी-२ या वाणांच्या कापूस बियाण्यांना मान्यता दिली आहे. 'राउंडअप बीटी', 'चोर बीटी', 'वीडगार्ड' किंवा एचटीबीटी यासारखी बियाणे बेकायदेशीर असून ती पर्यावरणास घातक आहेत. या बियाण्यांचा वापर केल्यास पर्यावरण संरक्षण कायद्यांतर्गत दंडाची तरतूद करण्यात आली आहे.

शेतकऱ्यांची फसवणूक टाळण्यासाठी कृषी विभागाने मार्गदर्शक सूचना जारी केल्या आहेत. बियाणे केवळ अधिकृत परवानाधारक विक्रेत्यांकडूनच खरेदी करावे. खरेदी करताना पक्के बिल अवश्य घ्यावे. त्यात पीक, वाण, लॉट क्रमांक आणि कंपनीचे नाव असल्याची खात्री करावी. पॅकेटवर सरकारमान्य अधिकृत चिन्ह तपासावे. बीजी-२ (बोलगार्ड २) वाणाची किंमत ९०१ रूपये आहे. बियाणे पाकीट पूर्णपणे सीलबंद असल्याची खात्री करावी. पाकीटावरील बियाणे उगवणीची अंतिम मुदत तपासून पहावी. सर्व वाणांमध्ये बीजी-२ तंत्रज्ञान सारखेच असल्याने विशिष्ट वाणाचा आग्रह धरू नये. १०० मिलीमीटर पाऊस झाल्याशिवाय कापूस लागवड करू नये, पूर्व हंगामी लागवड टाळावी. विक्रेत्याने पक्के बिल देण्यास नकार दिल्यास तालुका कृषी अधिकारी किंवा कृषी अधिकारी (गुणनियंत्रण) यांच्याशी संपर्क साधावा. बेकायदेशीर बियाणे विनापावती आणि चढ्या दराने विकले जातात. त्यांच्या पाकीटावर गुणवत्तेचे विवरण, तंत्रज्ञान किंवा कोणत्या क्षेत्रासाठी शिफारस केली आहे, याचा कोणताही उल्लेख नसतो. जिल्ह्यात जर अशा बोगस बियाण्यांची विक्री किंवा लागवड करताना आढळल्यास, तात्काळ कृषी विभागाच्या क्षेत्रीय कार्यालयांना कळवावे. ही माहिती देणाऱ्याचे नाव गोपनीय ठेवले जाते, असे जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी राहुल सातपुते यांनी कळविले आहे.

# अमरावती जिल्हा परिषदेला नवे नेतृत्व : सत्यम गांधी सीईओपदी, संजिता महापात्र सांगलीत आयुक्त

प्रतिनिधी ३ एप्रिल



**अमरावती :** जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी (सीईओ) पदाची धुरा आता सत्यम गांधी यांच्या हाती सोपविण्यात आली आहे.

२०२० च्या बॅचचे आयएएस अधिकारी असलेले गांधी यांची ही नियुक्ती प्रशासनासाठी महत्त्वाची मानली जात आहे. यापूर्वी ते सांगली-मिरज-कुपवाड महानगरपालिकेचे आयुक्त म्हणून कार्यरत होते. त्यांच्या शिस्तबद्ध, पारदर्शक आणि कार्यक्षम कार्यशैलीमुळे प्रशासकीय वर्तुळात त्यांची विशेष ओळख निर्माण झाली आहे.

अमरावती जिल्हा परिषदेत सीईओ पदाची जबाबदारी स्वीकारताना गांधी यांच्यासमोर विकासकामांना गती देणे, विविध शासकीय योजनांची प्रभावी अंमलबजावणी करणे आणि ग्रामीण भागातील प्रश्नांना प्राधान्याने सोडवणे अशी मोठी जबाबदारी असणार आहे. त्यांच्या अनुभवाचा लाभ जिल्ह्याच्या सर्वांगीण विकासासाठी होईल, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

दरम्यान, मुख्य कार्यकारी अधिकारी संजिता महापात्र यांची बदली सांगली-मिरज-कुपवाड महापालिकेच्या आयुक्तपदी करण्यात आली आहे. त्यांनी अमरावती जिल्हा परिषदेत कार्यरत असताना विविध योजनांची प्रभावी अंमलबजावणी केली असून प्रशासनात शिस्त आणि गती निर्माण करण्यासाठी प्रयत्न केले होते. त्यांच्या कार्यकाळात अनेक विकासकामांना चालना मिळाली होती.

संजिता महापात्र यांच्या या बदलीमुळे दोन्ही ठिकाणी प्रशासनात नवे बदल घडून येणार असून, नव्या जबाबदाऱ्यांमुळे दोन्ही अधिकाऱ्यांकडून प्रभावी कामगिरीची अपेक्षा व्यक्त होत आहे.

# राज्यमंत्री डॉ. पंकज भोयर यांचा दौरा

प्रतिनिधी ३ एप्रिल

**अमरावती:** राज्यमंत्री डॉ. पंकज भोयर यांचा शुक्रवार दि. ३ एप्रिल रोजी जिल्ह्याच्या दौरा आहे.



दौऱ्यानुसार नामदार भोयर शुक्रवार, ०३ एप्रिल रोजी सकाळी १० वाजता वर्धा येथून वाहनाने अमरावतीकडे प्रयाण. दुपारी १२ वाजता काँग्रेस नगर येथे आगमन व माजी मंत्री श्रीमती वसुधाताई देशमुख यांच्या निवासस्थानी सदिच्छा भेट. दुपारी १२.३० वाजता संत ज्ञानेश्वर सांस्कृतिक भवन मोर्शी रोड, येथे अमरावती विभागीय शिक्षण मेळाव्यास तसेच सत्कार समारंभास उपस्थिती. दुपारी १.३० वाजता सिटी लँड अमरावती येथे साधना सहकारी बँक लि. च्या नविन शाखेचे उद्घाटनास उपस्थिती. दुपारी २ वाजता अमरावती येथून शासकीय वाहनाने वरूडकडे प्रयाण करतील.

# अमरावती महानगरपालिकेला नवे नेतृत्व; वर्षा मुकुंद लड्डा आयुक्तपदी नियुक्त

प्रतिनिधी ३ एप्रिल

**अमरावती :** महानगरपालिकेच्या आयुक्तपदी वर्षा मुकुंद लड्डा यांची नियुक्ती करण्यात आली आहे. राज्य शासनाने हा महत्त्वाचा निर्णय घेत शहराच्या प्रशासनाला नवे नेतृत्व दिले आहे. अनुभवी आणि कार्यक्षम अधिकारी म्हणून ओळख असलेल्या श्रीमती लड्डा यांच्या नियुक्तीमुळे शहराच्या विकासाला गती मिळेल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.



वर्षा मुकुंद लड्डा यांनी यापूर्वी विविध विभागांमध्ये काम करताना प्रशासनात पारदर्शकता, शिस्त आणि कार्यक्षमता वाढवण्यावर विशेष भर दिला आहे. त्यांच्या कामकाजाची पद्धत वेगवान आणि परिणामकारक असल्याने त्यांनी हाताळलेल्या जबाबदाऱ्यांमध्ये सकारात्मक बदल घडून आले आहेत.

अमरावती शहरात सध्या अनेक प्रलंबित प्रश्न आहेत. त्यात स्वच्छता व्यवस्था, पायाभूत सुविधा, पाणीपुरवठा आणि नागरिकांना दिल्या जाणाऱ्या सेवांचा दर्जा उंचावणे या बाबी महत्त्वाच्या आहेत. या सर्व मुद्द्यांवर श्रीमती लड्डा विशेष लक्ष देणार असल्याचे संकेत मिळत आहेत. नागरिकांना अधिक चांगल्या सुविधा मिळाव्यात यासाठी त्या ठोस आणि प्रभावी निर्णय घेतील, असा विश्वास व्यक्त केला जात आहे. दरम्यान, त्यांच्या नियुक्तीचे विविध स्तरांवर स्वागत होत असून नागरिकांकडूनही सकारात्मक प्रतिक्रिया उमटत आहेत. शहराच्या सर्वांगीण विकासासाठी त्यांच्या नेतृत्वाखाली प्रशासन अधिक सक्षम होईल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे. विद्यमान आयुक्त सोम्या शर्मा या प्रसूती रजेवर गेल्यामुळे शासनाने त्यांच्या जागी नवनिर्वाचित आयुक्त लड्डा यांची नियुक्ती केली आहे.

## अपघातमुक्त अमरावतीकडे वाटचाल : आरटीओच्या 'रस्ता सुरक्षा रथा'द्वारे व्यापक जनजागृती

प्रतिनिधी ३ एप्रिल

**अमरावती :** राज्यात वाढत्या रस्ते अपघातांना आळा घालण्यासाठी परिवहन विभागामार्फत रस्ता सुरक्षा अभियान २०२६ अंतर्गत 'रस्ता सुरक्षा रथ' ही विशेष जनजागृती मोहीम सुरू करण्यात आली आहे. त्याअंतर्गत प्रादेशिक परिवहन कार्यालय, अमरावती यांच्या वतीने सुसज्ज व आधुनिक तंत्रज्ञानाने सुसज्ज असा रस्ता सुरक्षा रथ तयार करण्यात आला आहे. या रथाचे उद्घाटन प्रादेशिक परिवहन अधिकारी उर्मिला पवार यांच्या हस्ते फित कापून करण्यात आले तसेच त्यांनी रथाला हिरवी झेंडी दाखवून जनजागृती मोहिमेची औपचारिक सुरुवात केली.